पालीची तक्रार

बालीची लोककथा


पुनर्लेखन: ॲन मार्टीन बोलर

चित्रे: गस्ती मेड सुकनादा

मराठी अनुवाद: सुशील मेन्सन



एका बेटावर झाडाफुलांनी बहरलेल्या एका गर्द जंगलात गेको नावाची एक विशाल पाल राहात असे. या बेटाला आज आपण *बाली* या नावाने ओळखतो. या जंगलात इतके कीटक होते की अन्नासाठी पालीला इतरत्र कुठे जावे लागत नसे. जेव्हा डास गेकोच्या वटवृक्षाजवळ येऊन गुणगुण करत तेव्हा ती आपली लांबलचक, चिकट जीभ बाहेर काढून त्यांना पकडत असे.





इतर प्राण्यांना जी कामे करणे शक्य होत नसे ती कामे ही पाल सहजपण करत असे. आपल्या बोटांवर असलेल्या छोट्या छोट्या हुकांच्या मदतीने ती झाडावर सरसर चढत असे, फांद्यांवर लगबगीने पळत असे. जेव्हा ती आपले शेपूट गमवत असे, तेव्हा तिला आधीपेक्षाही मजबूत नवी शेपूट येत असे. गेकोला रात्री जंगलात भटकायला आवडत असे. ती मोठ्याने “गेको, गेको” असे ओरडत जंगलात झोपलेल्या प्राण्यांना जागे करत असे. सर्व प्राणी गेकोला निष्काळजी, स्वार्थी समजत असत.



पण गेकोच्या अशा ओरडण्यामागे एक कारण होते. कधीकधी सुतार पक्षी रात्रभर त्याच्या झाडावर चोच मारून गेकोला जागे ठेवत असे. काहीवेळा, झोप लागल्यावर असंख्य काजवे त्याच्या जवळ गोळा होत. ते त्याच्याभोवती उडू लागत आणि संध्याकाळच्या आकाशाला आपल्या प्रकाशाने उजळून टाकत. त्यांची लाल-पिवळी शरीरे, आगीच्या ठिणग्यांसारखी दिसत.





एकदा संध्याकाळी काजवे गेकोच्या वटवृक्षाभोवती जमले. आधी एक काजवा झगमगला. मग इतर काजवेही प्रतिसाद देऊन झगमगू लागले. जंगलात दूरवर प्रकाशाचे पुंजके चमकू लागले. या प्रकाशाच्या तेजामुळे रात्र जणू दिवस वाटू लागली. कित्येक तास ते काजवे झगमगत होते. शेवटी गेकोला ते सहन करणे अशक्य झाले. “गेको, गेको!” ती ओरडू लागली आणि जंगलच्या राजाकडे तक्रार करण्यासाठी सावकाशपणे डोंगर चढू लागली.





“काही महत्त्वाचं बोलायचंय का?” जंगलच्या राजाने बिछान्यातून उठत विचारले. “मध्यरात्र झालीय.”

“होय महाराज! खूप महत्त्वाचं आहे,” गेको त्वरीत उत्तरली. “मी झोपू शकत नाहीये. काजवे तासनतास झगमग करतायत माझ्या घराजवळ.”

सिंहाने मंद स्मित केले. “आपल्या दोघांची समस्या एकच आहे. काजवे तुला त्रास देतायत आणि तू मला.”

“होय,” गेको शरमेने म्हणाली. “मी तक्रार केली नसती, महाराज, पण मी अजिबात झोपू शकत नाहीये!”

“मी बघतो काय करायचं ते,” सिंहाने आश्वासन दिले.





पुढल्या दिवशी सकाळी सिंह काजव्यांकडे गेला आणि त्याने विचारले, “तुम्ही इतरांना त्रास का देता? रात्री जंगलात सर्वत्र शांतता ठेवायला हवी.”

काजवे नम्रपणे म्हणाले, “आम्ही झगमगतो, पण दुसऱ्याला त्रास द्यायचा हेतू नसतो आमचा. सुतार रात्रभर झाडावर चोच मारून सावध राहायची सूचना देतो. आम्ही फक्त त्याचा संदेश इतरांपर्यंत पोहोचवतो.”





सुतार पक्ष्याला शोधण्यात सिंहाला काहीच अडचण आली नाही. त्याची झाडावरची टकटक जंगलात दूरपर्यंत घुमत होती. “तू झाडावर सतत टकटक का करत असतोस?” सिंहाने विचारले.

सुतार त्वरीत उत्तरला, “महाराज, रातकिडा जंगलातल्या रस्त्यावर शेण टाकत जातो. त्याच्या या गलिच्छ शेणामुळे आपण सगळे आजारी पडू. त्याआधीच त्याला थांबवायला हवं. त्यासाठीच मी टकटक करून सर्वांना सावध करत असतो.”

“ही समस्या गंभीर आहे!” सिंहाला पटले. “मी रातकिड्याला शोधतो लगेच.”





काळा गुबगुबीत रातकिडा घासून गुळगुळीत केलेल्या तांब्यासारखा चमकत होता. तो शेणाचे गोळे ढकलण्यात दंग होता. सिंह त्याच्याकडे गेला आणि आपल्या मनातली शंका त्याला विचारली. रातकिड्याने आपले काम थांबवले आणि नम्रपणे म्हणाला, "या रस्त्यावर म्हैस ये-जा करत असते, महाराज. चालता चालता ती शेण टाकत जाते. मी शेण बाजूला सारून हा रस्ता साफ करतो. मी माझं कर्तव्य करतोय एवढंच."

सगळयांच्या तक्रारींना कंटाळून सिंह आपल्या घराकडे चालला. जाताना त्याने काळया रातकिड्याला आदेश दिला. "तुला म्हैस दिसली तर तिला मला भेटायला सांग."



म्हैस पळतच सिंहाच्या घरी गेली. “कुणाला माझ्या कामाचं महत्त्व कळतंच नाही! पावसामुळे जंगलातल्या रस्त्यांवर मोठेमोठे खड्डे पडतात. ते खड्डे भरण्यासाठी मी शेणाचे गोळे टाकत जाते. त्यामुळे कुणी खड्ड्यात न पडता सहजपणे रस्त्यावरून चालू शकतात.”

सिंहाने एवढी मोठी गर्जना केली की सारे जंगल हादरले. न संपणाऱ्या तक्रारी ऐकून ऐकून सिंह वैतागला होता. मग सिंहाने थेट पावसाशीच बोलायचे ठरवले. तो *गुनंग बटुर* या उंच पर्वताच्या दिशेने चालू लागला. त्या पर्वतावरून पाऊस खूप जवळ दिसला असता.





सिंह सावकाश पर्वत चढू लागला, तेव्हाच ढग जमा होऊ लागले. जोरदार वाऱ्यामुळे सिंहाचा वरचा प्रवास खडतर झाला. गुनंग बटुरच्या शिखरावर पोहोचल्यावर तो मोठ्याने गरजला. “पावसा, तू आमच्या जंगलातले रस्ते का खराब करतोस? त्यामुळे माझ्या प्राण्यांना त्यावर चालणं अवघड होतं?”








पावसाच्या उत्तराची वाट पाहात थकलेला सिंह जमिनीवर बसला. त्याने वरून बाली बेटाकडे बघितले. त्याला चमचमत्या नद्या, वाहात्या ढगांनी भरलेले निळेशार आभाळ आणि हिरवाईने मढलेल्या टेकड्या दिसल्या. पावसाचे थेंब पडू लागले तसे त्याच्या थकलेल्या शरीराला उभारी आली आणि साऱ्या जंगलामध्ये नवचैतन्य पसरले. वाऱ्याच्या गार झुळुकांनी त्याच्या साऱ्या चिंता दूर सारल्या.

आपण पावसाला किती मूर्ख प्रश्न विचारला, असे आता सिंहाला वाटू लागले. तिथेच विश्रांती घेत तो आपल्या बेटाचे सौंदर्य डोळयांत भरू लागला. पावसामुळे कुणाकुणाचा फायदा होतो? तो विचार करू लागला. रंगीबेरंगी पक्षी, ताकदवान प्राणी आणि अगदी छोटेसे डास यांचासुद्धा. सिंह मंद स्मित करत, आजुबाजुच्या निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेत घराकडे चालू लागला.



घरी पोहोचल्यावर सिंहाने गेको आणि इतर साऱ्या तक्रारदारांना बोलावून घेतले. सिंह कठोरपणे त्यांना म्हणाला, “पावसाने आपल्याला काय काय दिलंय ते पाहा एकदा. नद्या, जंगलातली विविध झाडं, आपण खातो ते अन्न!”



“आणि गेको, तुला आठवण करू द्यायला आवडेल मला की पाऊस नसला तर डाससुद्धा नसतील आणि डास नसले तर तू खाणार काय आणि जगणार कशी?”





आपल्या धारदार आवाजात सिंहाने आदेश दिला. “तुमच्या तक्रारी बंद करा. घरी जा आणि एकमेकांशी शांततेत प्रेमाने राहा.”







बाली बेटाच्या प्राण्यांनी राजाची आज्ञा शिरसावंद्य मानली.

आता, सुतार गेकोच्या झाडावर टकटक न करण्याची काळजी घेतो. काजवे आजही आपल्या प्रकाशाने आभाळाला उजळून टाकतात, पण ते गेकोच्या जवळपास येत नाहीत. आणि गेको दिवसेंदिवस गुबगुबीत होत चालली आहे. आता तक्रार करायला तिच्याजवळ काही कारणच उरलेले नाही.